**MHBI090011692022**

## न्यायनिर्णय

( घोषीत दिनांक : ०५.०५.२०२५ )

१. सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाच्या हकीकतीचा विचार करता, खालील मुद्ये माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यावर मी माझे निष्कर्ष त्याखालील नमुद कारणाआधारे नोंदविले आहेत.

| विचाराधिन मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|
| १) अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२०.०९. २०२२ रोजी १८.२० वा. आरोपी मोंढा गल्ली आंबेडकर चौकातील माळवदाचे रूममध्ये विनापरवाना : कल्याण मटका नावाचा जुगार आकडयावर पैसे लावून खेळत व खेळवित असतांना मिळून आले आणि त्याद्वारे मुंबई जुगार अधिनियम कलम १२ (अ) खालील गुन्हा केला ? | नाही. |
| २) आदेश कोणते ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

### कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिताः—**

२. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने जप्ती पंच सा.क्र.१ नारायण गायगवे व सा.क्र.२ मुन्ना शेख यांची साक्ष अनुक्रमे नि. १५ व २२ वर नोंदविली आहे. पुरेशी संधी देवून देखील अभियोग पक्षाने इतर साक्षीदार तपासले नाहीत त्यामुळे नि.क्र. १ च्या आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

३. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले जप्ती पंच सा.क्र.१ नारायण गायगवे व सा.क्र. २ मुन्ना शेख यांनी असे कथन केले की, ते ठेंबरे पोलिस यांना ओळखत नाहीत. ते पंचनामा करण्यास कोठेही गेले नाही व त्यांचे समक्ष पंचनामा केला नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे त्याची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त नाही. या कामी तपासलेल्या पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत केलेली नाही. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये आरोपींच्या ताब्यातुन जप्त केलेले जुगाराचे साहीत्य व नगदी रक्कम रु.५७३०/ आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केली याबाबत काहीही सांगत नाही. प्रस्तुत प्रकरणी घटनास्थळी तपासिक अधिकारी यांनी खरोखरच घटना स्थळी आरोपी हा लोकांकडून पैसे घेवून विनापरवाना

कल्याण मटका नावाचा जुगार स्वत:च्या फायद्याकरीता आकडयावर पैसे लावून खेळत व खेळवित आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी बोगस ग्राहक पाठविल्याचे दिसुन येत नाही.

४. एकंदरीत अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसुन येते की, आरोपीविरूध्द ठोस पुरावा अभिलेखावर अभियोग पक्ष आणु शकला नाही. केवळ फितुर जप्ती पंच या साक्षीदाराच्या पुराव्यावर विश्वास ठेवुन आरोपी विरुध्द सदर गुन्हा शाबीत होण्याइतपत पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

५. आरोपीने मुंबई जुगार अधिनियम कलम १२(अ) खाली गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने निर्विवादपणे व शाश्वत संशयापलीकडे जावुन सिध्द केलेली नाही असे माझे मत आहे. सहाजिकच प्रस्थापित कायद्यातील तत्वांनुसार संशयाचा फायदा आरोपीला देणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी मुद्या क्रमांक १ चा निष्कर्ष नकारात्मक नोंदविते.

<u>मुद्दा क्रमांक २ करिता:—</u>

६. मुद्या क्रमांक १ वर नोंदविलेल्या निष्कर्षाचा विचार करता, अभियोग पक्षाने प्रस्तुतची केस आरोपीविरूध्द संशयापलीकडे जावुन सिध्द केलेली नाही असे माझे मत आहे. सबब मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई जुगार अधिनियमाच्या कलम १२(अ) खालील दंडणीय गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र व वैयक्तीक जात मुचलका रद्य करण्यात येत आहे.

३. आव्हान याचिकेस सामोरे जाण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ प्रमाणे आरोपीने पुढील सहा महिन्यांकरीता कायम राहिल असे रक्कम रूपये १५,०००/— चा जामीन आणि वैयक्तीक बंधपत्र सात दिवसांच्या आत दाखल करावे.

४. जप्त मुद्येमाल जुगाराचे साहीत्य अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावे आणि प्रकरणात जप्त करण्यात आलेली एकुण रोख रक्कम रु.५७३०/— अपील कालावधी नंतर सरकार जमा करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).**

Digitally signed by RANJANA SUKHDEV GOSAVI
Date: 2025.05.09 17:19:21 +0530

माजलगाव.
दिनांक : ०५/०५/२०२५

( सौ. आर.एस.गोसावी )
२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
माजलगाव.